पुण्यनगरी पा. नं. ४.

# खलिस्तान समर्थकांना पाकमधून फंडिंग – मान

## परिस्थिती हाताळण्यास पंजाब पोलीस सक्षम

**। भावनगर :** पंजाबमध्ये धुमाकूळ घालणाऱ्या कथित खलिस्तान समर्थकांना पाकिस्तान व इतर देशांतून फंडिंग (अर्थसहाय्य) होत असल्याचा दावा राज्याचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी रविवारी केला. पंजाबमध्ये 'खलिस्तान' नावाने खळबळ माजवणे व अस्थिरता पसरवण्याचा प्रयत्न सुरू आहे; परंतु आमचे पोलीस हा मनसुबा हाणून पाडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



गुजरातच्या भावनगर जिल्ह्यात आयोजित सामूहिक विवाह सोहळ्याला पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी हजेरी लावली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी खलिस्तानी आंदोलनावर भाष्य केले. पंजाबमधील मूठभर लोक खलिस्तान चळवळीचे समर्थन करत आहेत. ते हिंसक आंदोलन करत आहेत; परंतु केवळ १ हजार लोक पंजाबचे नेतृत्व करू शकत नाहीत. पंजाबचे पोलीस खलिस्तानी लोकांचे आंदोलन हाताळण्यास सक्षम आहेत, असे भगवंत मान यांनी नमूद केले. पंजाबच्या तुलनेत राजस्थानची सर्वाधिक सीमा पाकला लागून आहे. तरीही राजस्थान सोडून पंजाबमध्ये ड्रोन पाठवले जात आहेत. यावरून पाकिस्तान व इतर देश खलिस्तानी लोकांना फंडिंग (अर्थसहाय्य) करत असल्याचे मान म्हणाले. विशेष बाब अशी की, खलिस्तानविषयी सहानुभूती बाळगणाऱ्या अमृतपाल सिंह यांच्या समर्थकांनी अमृतसरमध्ये पोलिसांवर नुकताच हल्ला केला. त्यामुळे राज्यात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवला आहे. या पार्श्वभूमीवर भगवंत मान म्हणाले की, पंजाबने इतिहासात वाईट दिवसांचा सामना केला. आता खलिस्तानी समर्थक उपद्रव माजवत आहेत. त्याचा सामना करण्यास पंजाब पोलीस सक्षम आहे. राज्यातील शांतता व सौहार्द धोक्यात आणण्याचा प्रयत्न अजिबात खपवून घेणार नसल्याचे मान यांनी ठणकावले. पवित्र 'गुरू ग्रंथ साहिब' पोलीस ठाण्यात आणणारे लोक हे पंजाबचे खरे 'वारीस' असू शकत नाहीत, असेही ते म्हणाले.

पुढारी पा. नं. ५.

# हिंदूबहुल वस्तीत दफनभूमी नको !

## वसईत महिलांसह हजारो हिंदूबांधवांचा आक्रोश मोर्चात सहभाग

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

वसई-विरार महानगरपालिके तर्फे वसई रोड पश्चिमेतील सनसिटी येथे निर्माण करण्यात येणाऱ्या स्मशानभूमीत कबरस्थान ही तयार करण्यात येत असून ती जागा ही हिंदू बहुल असल्याने येथें दफनभूमी निर्माण करण्यात येत असल्याचा निषेध करून हजारोंच्या संख्येने वसई-विरारमधील हिंदू बांधवांनी जन आक्रोश मोर्चा काढला.

रविवारी निघालेल्या या मोर्च्यात महिलांचाही मोठा सहभाग होता. भगव्या ध्वजाच्या गराड्यात परिसरात दुमदुमणाऱ्या जय श्रीराम, वंदे मातरम अश्या घोषणांसह हनुमान चाळीसा ही यावेळी पठण करण्यात आला. तर कब्रस्थान विरोधी लढ्याचे विविध फलक यावेळी मोर्चेकर्यांच्या हातात होते. कोणत्याही धर्म विशेष विरोधात हा लढा नसून लोकशाही प्रमाणे आमची ही मागणी आहे. त्यामुळे आमची सनातनी सहिष्णुता लक्षात घेऊन महानगरपालिकेने येथे दफनभूमी उभारू नये. हिंदुनाच या सगळ्या गोष्टींचा का सामना करावा लागतो? असा सवाल उपस्थित करून यापुढे लव्ह जिहाद, लँड जिहाद सहन केले जाणार नाही. संवैधानिक हक्का प्रमाणे शांततेत आमचा हा मोर्चा इशारा समजावा अन्यथा येथे ही कारसेवा सुरू करावी लागेल, तर १६ सप्टेंबर २०१३ मध्ये उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच पालन केले जात नाही , असे म्हणणे मोर्चेकऱ्यांचे होते. दुख्खाच्या क्षणी इतक्या दूर अंतयात्रा काढावी लागल्याने त्यांना भविष्यात त्रास होऊ नये हा सुद्धा आपला हेतू असल्याचे हिंदू संघटनांनी सांगितले.

### पोलिसांच्या मध्यस्थीमुळे वातावरण शांत

वसई विरार महानगरपालिका ने केलेल्या दफनभूमीच्या वादातून निघालेल्या मोर्चा मध्ये काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र पोलिसांनी मध्यस्थी करत मोर्च्यात आंदोलन करणाऱ्या लोकांना शांत केले. वसई-विरारमध्ये उभारण्यात आलेल्या दफनभूमी विरुद्ध हा जनाक्रोशी मोर्चा स्थानिकांकडून काढण्यात आला आहे. हिंदू वस्तीत दफनभूमी का या प्रश्नांवर हा जनाक्रोशी मोर्चा काढण्यात आला. यावेळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

Scanned with CamScanner

सामना पा-नं.२०

## पंडितांचे पुन्हा टार्गेट किलिंग सुरू

# पुलवामात कश्मिरी पंडिताची गोळ्या घालून हत्या

### पत्नीसह बाजारात जात असताना दहशतवाद्यांनी केला हल्ला

श्रीनगर, दि. २६ (वृत्तसंस्था)- कश्मीरात पुन्हा पंडितांचे टार्गेट किलिंग सुरू झाले असून आज सकाळी पुलवामा जिल्ह्यात पत्नीसह बाजारात जात असलेल्या कश्मिरी पंडिताची दहशतवाद्यांनी गोळ्या घालून हत्या केली. संजय शर्मा (४०) असे पंडिताचे नाव असून ते अचान गावातील बँकेत सुरक्षारक्षक म्हणून कामाला होते. गंभीर जखमी झालेल्या शर्मा यांना रुग्णालयात नेले जात असताना त्यांचा मृत्यू झाला. २०२३ सालात दहशतवाद्यांकडून करण्यात आलेली कश्मिरी पंडिताची ही पहिली हत्या आहे.

कश्मीर घाटीत २०२१ सालापासून पंडितांचे टार्गेट किलिंग सुरू आहे. अत्यंत पद्धतशीरपणे कश्मिरी पंडितांचे नाव विचारून, धर्म विचारून तर कधी थेट बँक आणि शाळेत घुसून पुरुष-महिला पंडितांचे हत्यासत्र सुरू केले आहे. त्यामुळे आम्हाला संरक्षण पुरवा आणि आमचे कामाचे ठिकाण जम्मूतून हलवा, अशी मागणी करत सरकारी नोकरीत असलेल्या शेकडो कश्मिरी पंडितांनी गेल्या वर्षी घाटी सोडून जम्मूत पलायन केले होते. ऑक्टोबर २०२२पर्यंत कश्मिरात पंडितांचे हत्याकांड सुरू होते. दरम्यान, १ जानेवारी २०२३मध्ये राजौरीमधील डांगरी गावात दहशतवाद्यांनी घरात घुसून केलेल्या गोळीबारात दोन लहान मुलांचा मृत्यू झाला होता.

### दोन वर्षांत एकही अटक का करण्यात आली नाही

कश्मीर पंडितांना दहशतवाद्यांनी पुन्हा टार्गेट करायला सुरुवात केली असून ही अत्यंत चिंतेची बाब आहे. हत्या झालेली व्यक्ती हिंदू, मुस्लीम किंवा शीख असली तरी अशा प्रकारच्या हत्येचा आम्ही जाहीर निषेध करतो. अशा प्रकारे गेल्या ३० वर्षांत टार्गेट किलिंग करणाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. मात्र गेल्या दोन वर्षांत अशा हत्यांप्रकरणी एकालाही अटक करण्यात आलेली नाही, ही चिंतेची बाब आहे, असे डीपीएपी पक्षाचे प्रमुख गुलाम नबी आझाद यांनी म्हटले आहे.



### हल्ल्याचा राजकीय फायदा भाजप उचलत आहे

कश्मीरमध्ये अल्पसंख्याक हिंदू समाजामधील कश्मिरी पंडितांवर सुरू असलेल्या दहशतवादी हल्ल्याचा राजकीय फायदा भाजप उठवत आहे. अल्पसंख्याक हरयाणातील असो की, कश्मीरमधील, अल्पसंख्याकांच्या जीवनाचे संरक्षण करण्यात भाजपला अपयश आले आहे. भाजप मुस्लिमांची इमेज खराब करण्यासाठी अशा प्रकारच्या घटनांचा वापर करत असते. पण अशा घटना सरकारचे अपयश उघड करते, असा आरोप पीडीपीच्या अध्यक्षा मेहबुबा मुफ्ती यांनी केला आहे.

### २०२२मध्ये २९ टार्गेट हल्ले

कश्मीर घाटीत २०२२मध्ये पंडित आणि काम करण्यासाठी आलेल्या कामगारांना टार्गेट करत २९ हल्ले झाले. हत्या करण्यात आलेल्यांमध्ये तीन पंच आणि सरपंच, तीन कश्मिरी पंडित, एक स्थानिक गायिका, राजस्थानमधील एक बँक मॅनेजर, जम्मूमधील एक शिक्षिका, एक सेल्समन आणि कश्मीरबाहेरून कामासाठी आलेल्या ८ कामगारांचा समावेश आहे. यात १० कामगार जखमी झाले होते. दरम्यान, दहशतवाद्यांनी सुरक्षा दलातील जवानांना टार्गेट करत त्यांच्यावर १२ हल्ले केले. यात २६ जवान शहीद झाले.

Scanned with CamScanner

म.टा.पु.पा.१.

# अपघाती क्रॉसिंग, खड्डे, दुभाजकांबाबत चिंता

म. टा. वृत्तसेवा, डहाणू

## महामार्गावरील अपघात रोखण्याच्या उपायांवर चर्चा

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील महाराष्ट्र-गुजरातच्या सीमेवरील आच्छाड ते घोडबंदरपर्यंतच्या पट्ट्यात अनेक समस्या आहेत. त्याकडे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने गेल्या वर्षभरात सातत्याने अपघात घडत आहेत. त्यामुळे हा भाग जणू मृत्यूचा सापळाच बनला आहे, असे सांगून अपघात रोखण्यासाठी महामार्ग प्राधिकरणाने उपाययोजना कराव्यात, अशी आग्रही मागणी डहाणूचे आमदार कॉम्रेड विनोद निकोले यांनी केली.

अहमदाबाद महामार्गावर अपघातांना आळा घालावा म्हणून उपाययोजना करण्यासाठी आमदार निकोले यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय येथील डहाणू विश्रामगृहात नुकतीच बैठक झाली. यावेळी या महामार्गावरील अपघाती क्रॉसिंग, फ्लायओव्हर, सेवा रस्ते, अपघातप्रवण क्षेत्रे, खड्डे, महामार्गावरील अतिक्रमणे, दुभाजकांची उंची आदी मुद्द्यांबाबत चर्चा करण्यात आली. या बैठकीला डहाणूचे तहसीलदार अभिजित देशमुख, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे मुकुंद अत्तरदे, आरकेसी कंपनीचे योगेंद्रसिंह वाघेला, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अजय जाधव, कासा पोलिस निरीक्षक श्रीकांत शिंदे, कुशल राऊत इत्यादी उपस्थित होते.

या राष्ट्रीय महामार्गावर अनधिकृतरित्या वळणदार असे सिमेंटचे बॅरीकेड लावल्यामुळे दोन वर्षांत ७० जणाचा नाहक मृत्यू झाल्याचा आरोप आमदार निकोले यांनी केला. याबाबत आरटीओ, पोलिस तसेच स्थानिक प्रशासनाला वारंवार सांगूनदेखील कोणतीही कार्यवाही होत नव्हती, हे यापूर्वीही निकोले यांनी लक्षात आणून दिले होते. शिवाय त्यांनी स्वतः जेसीबीमध्ये बसून सिमेंटचे बॅरीकेड काढून टाकले होते.

लोकमत पा.नं.३.

# शिजानच्या जामिनावर आज कोर्टात सुनावणी

## बेल होणार की जेलच कायम राहणार?

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : टीव्ही मालिका 'अली बाबा : दास्तान -ए-काबुल'ची मुख्य अभिनेत्री तुनीषा शर्मा हिच्या आत्महत्येप्रकरणी तिचा माजी प्रियकर आणि सहकलाकार शिजान खान दोन महिन्यांपासून तुरुंगात आहे. सोमवारी होणाऱ्या जामिनाच्या सुनावणीत शिजानला जामीन मिळणार की कोठडी वाढणार, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

शिजानला जामीन मिळावा यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यासंदर्भात शिजानने यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता, मात्र तेथून याचिका मागे घेत सुटकेसाठी वसई सत्र न्यायालयात धाव घेतली होती. आत्महत्या प्रकरणात शिजान खानच्या जामिनाबाबत शुक्रवारी सुनावणी पुढे ढकलली होती.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी दोन्ही बाजूचे म्हणणे वसई न्यायालय ऐकून घेणार असून सोमवारीच किंवा मंगळवारी शिजानच्या जामिनाचा निर्णय होईल.

### शिजानविरुद्ध ५२४ पानांचे आरोपपत्र



अलीकडेच वालीव पोलिसांनी शिजान खानविरुद्ध ५२४ पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. ज्यामध्ये त्याच्यावर भारतीय दंड संहिता कलम ३०६ (आत्महत्येला प्रवृत्त करणे) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लागू केलेल्या कलमांतर्गत शिक्षेमध्ये दहा वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते.

Scanned with CamScanner

लोकमत पु.पा-३.

# उत्तनमध्ये वाहने घसरून दुचाकीचालक जखमी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदरच्या उत्तन रस्त्यावर पडलेल्या चिकट द्रवामुळे शनिवारी सायंकाळी अनेक दुचाकीस्वार घसरून पडून जखमी झाले.

अखेर स्थानिक नागरिकांनी त्या चिकट द्रवावर माती टाकली. शनिवार सुट्टीचा दिवस असल्याने उत्तन आणि गोराई समुद्र किनारी मोठ्या संख्येने नागरिक विरंगुळ्यासाठी जातात. शनिवारी सायंकाळी मात्र आनंदनगर ते काका बाप्टिस्टा चौक दरम्यानच्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पडलेल्या चिकट द्रवामुळे दुचाकी घसरून अपघात होऊ लागले.

अनेक दुचाकी घसरून त्यावरील दुचाकीस्वार जखमी झाले. ते पाहून परिसरातील नागरिकांनीच कडेला पडलेली माती-खडी हाताने उचलून रस्त्यावरील त्या चिकट द्रवावर टाकली. उत्तनच्या धावगी डोंगरावर असलेल्या पालिकेच्या कचरा प्रकल्पात कचरा वाहतूक करणाऱ्या गाडीतून रस्त्यावर सर्वत्र हा ऑइल मिश्रित चिकट द्रव पडल्याने दुचाकी घसरून अपघात झाल्याचे तेथील नागरिकांनी सांगितले. या परिसरात पूर्वीही कचरा वाहतूक गाड्यांमुळे अनेक अपघात घडल्याचे लोकांनी सांगितले.

सकाळ पा.नं.५.

# वसईत कब्रस्तानला हिंदूंचा विरोध

नालासोपारा, ता. २६ (बातमीदार) : सर्वधर्मीय स्मशानभूमीत मुसलमानांच्या कब्रस्तानला (दफनभूमी) जागा देऊ नये, अशी मागणी करत हिंदू धर्मियांनी वसई येथे आज (ता.२६) आंदोलन केले. सकल हिंदू समाज या नावाच्या बॅनरखाली हे आंदोलन करण्यात आले. या वेळी आंदोलकांनी स्मशानभूमीच्या दिशेने दगडफेक केली. त्यामुळे सौम्य लाठीमार करत पोलिसांना हा जमाव पांगवावा लागला. सध्या परिसरात तणावपूर्ण शांतता आहे.



वसई : सकल हिंदू समाजाच्या वतीने आंदोलनात सहभागी कार्यकर्ते.

वसई येथील सनसिटी परिसरात सर्वधर्मीय स्मशानभूमी उभारण्यात आली आहे. त्यानुसार मुस्लिम धर्मियांसाठी कब्रस्तानही देण्यात आले आहे, पण काही हिंदू धर्मीय लोकांचा याला विरोध आहे. हा परिसर हिंदूबहुल असून येथे मुसलमानांची दफनभूमी नको, असा पवित्रा त्यांनी घेतला आहे. त्यामुळे सकल हिंदू समाज या नावाखाली हिंदूंनी रविवारी सकाळी साडेदहा वाजता हिंदू आंदोलक स्मशानभूमीजवळ जमले. या वेळी काही जणांनी स्मशानभूमीच्या गेटवर चढून भिंत तोडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पोलिसांनी त्यांना अडवले.

## उत्तन कचराभूमीला पुन्हा आग

भाईंदर, ता. २६ (बातमीदार) : उत्तन येथील कचराभूमीला रविवारी (ता.२६) पुन्हा एकदा आग लागली. सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमाराला ही आग लागली. आगीमुळे मोठ्या प्रमाणात धूर पसरून आसपासच्या रहिवाशांना पुन्हा एकदा प्रचंड त्रास सहन करावा लागला. अवघ्या आठ दिवसात कचराभूमीला आग लागल्यामुळे ग्रामस्थांकडून संताप व्यक्त होत आहे.

उत्तन येथील कचराभूमीला १८ फेब्रुवारीला भीषण आग लागली होती. रात्री उशिरा आग विझवण्यात अग्निशमन दलाला यश आले. परंतु पुढील दोन दिवस ही आग धुमसत राहिल्याने ग्रामस्थांना धुराचा त्रास सहन करावा लगला होता. या घटनेला आठ दिवस होत नाहीत तोच रविवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास कचराभूमीला पुन्हा एकदा आग लागली. मात्र गेल्या वेळेपेक्षा आगीची तीव्रता कमी होती.

Scanned with CamScanner

पुढारी पा. नं. ३०

# महामार्गावरील उपाहारगृहांना मराठी भाषेचे वावडे

**मनोर : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई अहमदाबाद महामार्गावर वर्सोवा खाडी पासून गुजरात राज्याच्या हद्दीपर्यंत महामार्गाच्या दोन्ही बाजूंना असलेल्या हॉटेलांच्या पाट्या गुजराती भाषेत असल्याने आपण महाराष्ट्र राज्यात आहोत की गुजरात असा प्रश्न वाहनचालकांना पडत आहे. महामार्गावरील गुजराती पाट्यांबाबत जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष आणि अंमलबजावणीची जबाबदारी असलेले कामगार आयुक्त कार्यालयाकडून कारवाई होत नसल्याने गुजराती माय मराठी आपल्याच राज्यात दुर्लक्षित होत असल्याचा आरोप केला जात आहे. मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने तरी महामार्गावरील उपहारगृहांना मराठी पाट्यांची सक्ती केली जाईल का असा सवाल उपस्थित केला जात आहे.

मुंबई अहमदाबाद महामार्गाच्या सहा पदरीकरणा नंतर गेल्या काही वर्षांपासून महामार्गालगत दोन्ही बाजूंनी मोठ्या संख्येने हॉटेल्स उभी राहिली आहेत. महामार्गावरील अवजड वाहनांचे चालक आणि प्रवाशांच्या सोयीसाठीसुरू झालेल्या हॉटेल व्यवसायाने जोम धरला आहे.परप्रांतीय हॉटेल मालकांना मराठी भाषेबद्दल अनास्था असल्याने हॉटेलांच्या पाट्या मराठी ऐवजी इंग्रजी आणि गुजराती भाषेत लावण्यात आल्या आहेत.कायद्याने मराठी भाषेतील पाट्या ठळक स्वरूपात लावणे लावणे बंधनकारक असताना गुजराती पाट्या लावणाऱ्या हॉटेलांवर कारवाईची मागणी पुढे येत आहे.

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाचे २००२ मध्ये चौपदरीकरण आणि त्यानंतर सहापदरीकरण झाल्याने महामार्गावरील वाहनांच्या वर्दळीत वाढ झाली आहे.

महामार्गावर वाहनचालक आणि प्रवाश्यांना आराम,अल्पोपहार आणि जेवण आदी सुविधा उपलब्ध झाल्यामुळे महामार्गावर घोडबंदर पासून गुजरातच्या हद्दीपर्यंत मोठ्या प्रमाणात हॉटेल उभी राहिली आहेत.

पुढारी पा. नं. ३०

# भाजपच्या माजी नगरसेविकेकडून मारहाणीसह शिवीगाळ केल्याप्रकरणी पतीविरोधात गुन्हा दाखल

**मिरारोड :** मिरा भाईदर महापालिकेत २०१२ पासून मेघना रावल या त्यांचे पती दिपक रावल व एक मुलगा व मुलीसह भाईदर पूर्वेला राहतात. त्या प्रभाग क्रमांक ५ मधून भाजपच्या नगरसेविका म्हणून काम करत आहेत. मेघना रावल यांचे पती घरी कोणत्यातरी मुली बरोबर वारंवार फोनवर बोलत असताना मला मिळून आल्याने मेघना यांनी पती यांचा मोबाईल पाहीला त्यावेळी त्यांनी पतीला त्या मुलीबाबत विचारले असता त्या गोष्टीवरून मेघना यांना त्यांच्या पतीने शिवीगाळ करून मारहाण केली होती. त्यानंतर त्यांचे पती हे नेहमी त्यांचे मोबाईल मध्ये मी फोटो पाहीले असल्याच्या कारणावरून गोष्टीवरुन मेघना यांच्याशी नेहमी वाद घालून त्यांना शिवीगाळी करून मारहाण करत होते. त्यांचे पती यांचे बाहेरील मुलीशी अनैतिक संबंध असून त्याबाबत विचारणा केली असता मेघना यांना मारहान करत होते. तसेच मेघना या नगरसेविका असल्याने त्यांना कोणत्याही सामाजिक कामासाठी बाहेर जाऊ दिले जात नव्हते. गुरुवारी रात्री त्यांचे पती घरी आले त्यावेळी त्यांचे जेवणावरून भांडण झाले. त्यावेळी मेघना यांना त्यांचे पती यांनी शिविगाळ करुन ठोश्याबुक्यांनी मारहान करून त्यांना घरामधील किचन मध्ये बंदिस्त करून ठेवले. तसेच घरातून बाहेर काढून देण्याची धमकी दिली. मेघना यांना त्यांच्या नणंद यांनी त्यांना घरातून बाहेर काढले. त्यावेळी मेघना यांनी नवघर पोलिस ठाण्यात त्यांचे पती दीपक रावल यांच्या विरुद्ध शिविगाळ व मारहाण करून शारिरीक व मानसिक त्रास देत असल्यामुळे कलम ३२३, ३४२, ४९८, ५०४, ५०६ गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with CamScanner

# अवैध हथियार के साथ एक गिरफ्तार

वसई। एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्राइम ब्रांच 2 वसई यूनिट ने अवैध हथियार के साथ एक शख्स को गिरफ्तार किया है। उसके पास से टीम ने जिंदा कारतूस, गावठी कट्टा व रामपुरी चाकू आदि जप्त किया है।यह सफलता क्राइम डीसीपी अविनाश अंबुरे व एसीपी



अमोल मांडवे के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच 2 वसई यूनिट के पीआई शाहुराज रणवरे, सपोनि सागर शिंदे व सुहास कांबले की टीम ने पाई है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने शनिवार को दी है। पुलिस ने बताया कि 25 फरवरी (शनिवार ) को क्राइम ब्रांच 2 वसई को गुप्त सूचना मिली कि ओम साई पॅलेस बार के पास ओसवालनगरी,नालासोपारा पूर्व स्थित एक शख्स गावठी निर्मित कट्टा बिक्री करने के लिए आने वाला है। सूचना के आधार पर शाहूराज रणवरे, पुलिस निरीक्षक, क्राइम ब्रांच यूनिट 2, वसई व टीम के अधिकारी व कर्मचारियों ने उक्त स्थान पर जाल बिछाया और आरोपी पृथ्वीराज कुंदनप्रसाद भारती,निवासी-जानकी पाडा, आंबेडकरनगर, गोखीवरे,वसई पूर्व को दबोच लिया,दरअसल आरोपी मोटरसाइकिल क्र. एमएच 04-डीसी 3469 से आया था, फिलहाल,टीम द्वारा आरोपी की तलाशी ली तो इसके पास 1 गावठी कट्टा, 2 जिंदा कारतूस और 1 रामपुरी चाकू जप्त किया गया। वही तुलिंज पुलिस स्टेशन ने क्राइम ब्रांच 2 में कार्यरत पुलिस हवलदार सचिन पाटिल की शिकायत पर उक्त आरोपी के ऊपर कलम 3,25 (1) व अन्य धाराओं के तहत केस दर्ज कर लिया है।

Scanned with CamScanner

# देशी कट्टा, चाकू के साथ एक गिरफ्तार

■ **निसं, नालासोपारा:** क्राइम ब्रांच यूनिट 2 की टीम ने शुक्रवार देर रात ओसवाल नगरी इलाके से एक शख्स को एक देशी कट्टा, दो कारतूस व रामपुरी चाकू के साथ गिरफ्तार किया है। जानकारी के अनुसार, क्राइम ब्रांच यूनिट 2 के सहायक पुलिस निरीक्षक सागर शिंदे को शुक्रवार रात सूचना मिली थी कि ओसवाल नगरी के पास एक शख्स हथियार के साथ आने वाला है। सूचना के बाद टीम ने जाल बिछाकर ओम साई पैलेस बार के पास फुटपाथ पर हथियार लेकर आए पृथ्वीराज कुंदन प्रसाद भारती को गिरफ्तार कर लिया।

Scanned with CamScanner

लोकमत

# गावठी कट्ट्यासह आरोपी जेरबंद

## दोन काडतुसे जप्त : गुन्हे शाखा युनिट-२ च्या पोलिसांची कारवाई

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**नालासोपारा :** ओस्तवाल नगरी येथील परिसरातील बारजवळ एक गावठी कट्टा, एक रामपुरी चाकू, दोन जिवंत काडतुसांसह एका आरोपीला गुन्हे शाखेच्या युनिट-२ च्या पोलिसांनी शुक्रवारी रात्री पकडले आहे. पृथ्वीराज कुंदनप्रसाद भारती असे पकडलेल्या आरोपीचे नाव आहे. तुळींज पोलिसांनी शनिवारी गुन्हा दाखल करून मुद्देमाल जप्त करत हा आरोपी गावठी कट्टा नालासोपारा शहरात कोणाला विकण्यासाठी आला होता याचा तपास करत आहे.



> एका आरोपीला शस्त्र व जिवंत काडतुसांसह पकडले आहे. तुळींज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून आरोपीला तपास व चौकशीसाठी तुळींज पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.
>
> - शाहूराज रणवरे, पोलिस निरीक्षक, युनिट-२, गुन्हे शाखा

ओस्तवाल नगरी येथील ओम साई पॅलेस बारजवळ एक आरोपी गावठी कट्टा, एक रामपुरी चाकू, जिवंत काडतुसांसह विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती गुन्हे शाखा युनिट-२ चे पोलिस निरीक्षक शाहूराज रणवरे यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे त्यांनी गुन्हे शाखेच्या अधिकारी आणि त्यांच्या टीमला कारवाई करण्याचे आदेश दिले. यानंतर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सापळा लावला होता. शुक्रवारी रात्री २ वाजण्याच्या सुमारास एक संशयास्पद दुचाकीवरून फिरताना दिसल्यावर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन झडती घेतल्यावर एक गावठी बनावटीचा कट्टा, दोन जिवंत काडतुसे आणि एक रामपुरी चाकू अशी हत्यारे मिळून आली.

आरोपीविरोधात पोलिस हवालदार सचिन पाटील यांनी तुळींज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

ही कामगिरी पोलिस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलिस आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा वसई युनिट-२ चे पोलिस निरीक्षक शाहूराज रणवरे, सहायक पोलिस निरीक्षक सागर शिंदे, सुहास कांबळे, पोलिस हवालदार चंदन मोरे, महेश पागधरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, दादा आडके, प्रशांतकुमार ठाकूर यांनी केली आहे.

Hello Vasai
Page No. 1 Feb 27, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

पुढारी

# बोगस कुरिअर वेबसाईटद्वारे विद्यार्थ्याची ऑनलाईन लूट

## झारखंडच्या ३ भामट्यांना अटक

ठाणे : संतोष बिचकुले

नामांकित कुरिअर कंपनीची हुबेहूब वेबसाईट तयार करून मुंबईच्या विद्यार्थ्याचे ९५ हजार रुपये पळवणाऱ्या ३ भामट्यांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. सदर कारवाई मुंबईच्या नागपाडा पोलिसांनी झारखंडमध्ये केली. या आरोपींना मुंबईत आणल्यानंतर न्यायालयात हजर केले असता २८ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आल्याचे पोलिसांनी दै. 'पुढारी'ला सांगितले.

मुंबईतील नागपाडा परिसरात राहणाऱ्या २५ वर्षीय विद्यार्थ्याने गुगलवर कुरिअर कंपनीची वेबसाईट सर्च केली. त्यावेळी ओपन झालेल्या नामांकित कंपनीच्या वेबसाईटवरील नंबरवर विद्यार्थ्याने संपर्क साधला. गुगलवर लुटण्यासाठी पसरवलेल्या जाळ्यात विद्यार्थी अडकल्याचे लक्षात येताच भामट्याने कुरिअर कंपनीचा कर्मचारी असल्याचे भासवले. कुरिअर मिळण्यासाठी भामट्याने विद्यार्थ्याला ५ रुपये फी भरण्यासाठी मोबाईलवर लिंक पाठवली. विद्यार्थ्याने लिंक ओपन करताच त्याच्या मोबाईलचा ॲक्सेस भामट्याला मिळाला. त्यामुळे ऑनलाईन कुरिअर फी भरताना विद्यार्थ्याने वापरलेला पासवर्ड भामट्याच्या हाती लागला. दरम्यान काही वेळानंतर भामट्याने विद्यार्थ्याच्या बँक खात्यातून ९५ हजार रुपये पळवले. पैसे ट्रान्सफर झाल्याचे लक्षात येताच विद्यार्थ्याने नागपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली. या प्रकरणी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास तांत्रिक माहितीच्या आधारे केला असता आरोपी झारखंडमध्ये असल्याचे निष्पन्न झाले. त्या माहितीच्या आधारे उपायुक्त अकबर पठाण, एसीपी संजय कुरुंदकर, वपोनि महेशकुमार ठाकूर, पोनि रईस शेख यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील, पोउपनि रामप्रसाद चंदवाडे व इतर पथकाने झारखंड गाठले. तेथे सापळा लावून आरोपी सत्तार नूरमोहम्मद अन्सारी (२८), रियाज उस्मान मिया अन्सारी (२१), नझीर मुस्लीम अन्सारी (२८) यांच्या मुसक्या आवळल्या.

### देशभरात अनेकांची फसवणूक

ऑनलाईन लुटण्यासाठी भामट्यांनी गुगलवर जाळे पसरवल्याचे या गुन्ह्याच्या अनुषंगाने पुन्हा एकदा समोर आले आहे. सदर गुन्ह्यातील आरोपींनी बोगस कुरिअर कंपनीच्या वेबसाईटद्वारे मुंबई, दिल्ली, कोलकत्तासह देशातल्या अनेक राज्यांमधील नागरिकांना लुटल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. त्या अनुषंगाने या गुन्ह्याचा तपास नागपाडा पोलीस करत आहेत.

Thane Edition
Feb 25, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

Scanned with CamScanner

# फसवणूक करणाऱ्या बंटी-बबलीला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : रस्त्यात लोकांना मोबाइल बंद झाल्याचे सांगून त्यांच्याकडून फोन करण्यासाठी मोबाइल घेऊन तो घेऊन पळून जाणाऱ्या बंटी-बबलीला गुन्हे शाखेच्या युनिट-३ च्या पोलिसांनी अटक केली आहे. नालासोपारा आणि माणिकपूर या दोन पोलिस ठाण्यांतील दोन गुन्ह्यांची उकल केली आहे. लाखोंचा मुद्देमाल आरोपींकडून हस्तगत करत तपास व चौकशीसाठी आरोपींना माणिकपूर पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

नालासोपाऱ्याच्या वेस्ट ॲव्हेन्यू सोसायटीत राहणारा उमर अल हक (२१) हा तरुण १ फेब्रुवारीला सिविक सेंटरवरून सोपारा गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरून चालत होता. त्यावेळी वॅग्नार कारमधून आलेल्या आरोपी बबलीने माझ्या मोबाइलची बॅटरी संपली असून, मला फोन करायचा आहे, असे सांगून उमरकडून रिअल मी कंपनीचा मोबाइल घेतला. सोबत असणाऱ्या आरोपी बंटीने रोडच्या बाजूला गाडी घेतो, असे म्हणून गाडी बाजूला न घेता पळून गेले. लबाडीच्या इराद्याने मोबाइलची चोरी केली म्हणून तरुणाने नालासोपारा पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला. गुन्हे शाखेच्या युनिट-३ चे पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख यांना या आरोपी बंटी-बबलीबाबत माहिती मिळाली. त्यांच्या टीमने नायगावमधून आरोपी बंटी-बबलीला ताब्यात घेतले. ऋषिकेश जीडी (२१) व मुस्कान शहा (१९) अशी या बंटी-बबलीची नावे आहेत.

Hello Vasai
Page No. 1 Feb 26, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

CMYK

MHT

राष्ट्रीय हिन्दी दैनिक

# मुंबई हिंदमाता टाइम्स

मुंबई, रविवार 26 फरवरी 2023




सम-सामयिक घटनाउ
की जानकारी रखने वा
अनुभवी,इच्छुक महि
व पुरुष पत्रकारों क
आवश्यकता है। वेत
योग्यतानुसार दिया जाएग
मो०-986761476
-संपाद

संपादक: विजय आर. सिंह | RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com | वर्ष -18, अंक-48 | पृष्ठ-8 | मूल्य ₹5/- | संरक्षक: राजन पांडेय / सुनिल आचार्य

| आज का पंचाग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सराफा बजार |
|---|---|---|---|---|---|
| संवत् 2079, फाल्गुन शुक्ल पक्ष सप्तमी | 07.03 am 06.41 pm | सुबह मौसम साफ रहेगा। दिन में तापमान बढ़ेगा। | अधिकतम 33°C न्यूनतम 23°C | NSE Open: 17,591.35 \| Close: 17,465.80 BSE Open: 59463.93 \| Close: 59463.93 | Rs. 56,510 Per 10 gm Rs. 68,300 Per Kg |



# अवैध हथियार के साथ एक शख्स गिरफ्तार

**वसई ;** एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्राइम ब्रांच 2 वसई यूनिट ने अवैध हथियार के साथ एक शख्स को गिरफ्तार किया है। उसके पास से टीम ने जिंदा कारतूस,गावठी कट्टा व रामपुरी चाकू आदि जप्त किया है।यह सफलता क्राइम डीसीपी अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में क्राइम ब्रांच 2 वसई यूनिट के पी. आई शाहुराज रणवरे,स.पो.नि. सागर शिंदे व सुहास कांबले की टीम ने पाई है।यह जानकारी पुलिस अधिकारी ने शनिवार को दी है। पुलिस ने बताया कि 25 फरवरी (शनिवार ) को क्राइम ब्रांच 2 वसई को गुप्त सूचना मिली कि ओम साई पॅलेस बार के पास ओस्वालनगरी,नालासोपारा पूर्व स्थित एक शख्स गावठी निर्मित कट्टा बिक्री करने के लिए आने वाला है।सूचना के आधार पर शाहूराज रणवरे, पुलिस निरीक्षक, क्राइम ब्रांच यूनिट 2, वसई व टीम के अधिकारी व कर्मचारियों ने उक्त स्थान पर जाल बिछाया और आरोपी पृथ्वीराज कुंदनप्रसाद भारती,निवासी-जानकी पाडा,आंबेडकरनगर, गोखीवरे,वसई पूर्व को दबोच लिया,दरअसल आरोपी मोटरसाइकिल क्र.एमएच 04-डीसी 3469 से आया था, फिलहाल,टीम द्वारा आरोपी की तलाशी ली तो इसके पास 1 गावठी कट्टा,2 जिंदा कारतूस और 1 रामपुरी चाकू जप्त किया गया।वही तुलिंज पुलिस स्टेशन ने क्राइम ब्रांच 2 में कार्यरत पुलिस हवलदार सचिन पाटिल की शिकायत पर उक्त आरोपी के ऊपर कलम 3,25 (1) व अन्य धाराओं के तहत केस दर्ज कर लिया है।

Scanned with CamScanner

# सदनिकेच्या नावावर तरुणाची फसवणूक

## आरोपीला पोलिसांनी केली अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : सदनिकेच्या नावावर २४ वर्षीय तरुणाची लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या व फरार इस्टेट एजंट आरोपीला शुक्रवारी रात्री पकडण्यात नालासोपारा पोलिसांना यश मिळाले आहे. या आरोपीने कोणाची सदनिकेच्या नावावर फसवणूक केली असेल तर त्यांनी कागदपत्रांसोबत पोलिस ठाण्याशी संपर्क करण्याचे आवाहन नालासोपारा पोलिसांनी केले आहे.

भाईंदरच्या संकल्प बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या रघुनंदन यादव (२४) या तरुणाची सदनिकेच्या नावावर फसवणूक केली होती. आरोपी रियल इस्टेट एजंट सचिन तरकचंद गाला (४०) याने 3 फेब्रुवारी २०२० मध्ये श्रीप्रस्थातील ड्रीम टॉवरमध्ये २२ लाख ७५ हजार रुपयांना सदनिकेचा व्यवहार केला होता. या व्यवहारापोटी

> तरुणाच्या फसवणूकप्रकरणी गुन्हा दाखल होता. त्या गुन्ह्यातील आरोपीला शुक्रवारी पकडून अटक केली आहे. शनिवारी वसई न्यायालयात आरोपीला हजर केल्यावर सोमवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.
>
> \- राहुल सोनवणे, पोलिस निरीक्षक, गुन्हे. नालासोपारा पोलिस ठाणे

रघुनंदन याच्याकडून रोख व धनादेशाद्वारे ५ लाख ६१ हजार रुपये घेतले. उर्वरित रकमेचे लोन करून देतो, असे आश्वासन देऊन त्यांचे कागदपत्रे घेऊन आशापुरा रियालिटी याच्या पावत्या दिल्या होत्या. ठरलेला सदनिका खरेदीचा व्यवहार पूर्ण केला नाही व घेतलेली रक्कम परत न करता सदनिका खरेदीच्या व्यवहारात विश्वासघात करून फसवणूक केली होती.

Hello Vasai
Page No. 1 Feb 26, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# सायबर गुन्हे शाखेकडून विद्यार्थी संवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** पोलिस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील शालेय विद्यार्थ्यांमध्ये सायबर गुन्ह्यांच्या अनुषंगाने जनजागृती व्हावी याकरिता सैंथोम पब्लिक स्कूल व सायबर गुन्हे शाखेच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी सैंथोम पब्लिक स्कूल, मीरारोड येथे विद्यार्थी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.



या मेळावामध्ये विद्यार्थ्यांना दैनंदिन सोशल मीडिया वापराबाबत होणारे गुन्हे, तंत्रज्ञानाच्या युगामध्ये होणारे विविध प्रकारचे गुन्हे याबाबत जनजागृती करण्यात आली तसेच विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाबाबत असलेले गैरसमज, त्यांच्या प्रश्नांचे निरसन करण्यात आले. हा विद्यार्थी संवाद मेळावा पोलिस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहायक पोलिस आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, सायशा दलाल, विग्नेश भिसे यांच्या उपस्थितीत पार पडला. या संवाद मेळाव्यात एकूण २५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

Hello Vasai
Page No. 2 Feb 26, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner